# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६.**
**ई-मेल: mercindia@mercindia.org.in संकेत-स्थळ** www.mercindia.org.in

## जाहीर नोटीस

### प्रारुप "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०११"

"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून ग्राहक प्रतिनिधी म्हणून प्राधिकृत करण्यासाठी यादी तयार करणे: आयोगासमोरील कामकाजामध्ये ग्राहकांची बाजू मांडण्यासाठी ग्राहक प्रतिनिधी म्हणून व्यक्तींना प्राधिकृत करणे" या विषयावरील चर्चा-पत्रिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. २९ डिसेंबर, २०१० रोजीच्या नोटीशीद्वारे ग्राहक प्रतिनिधी, अन्य संबंधित आणि जनतेकडून हरकती आणि सूचना मागविलेल्या होत्या. सदर चर्चा-पत्रिकेवर प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचना विचारात घेऊन आयोगाने आता प्रारुप "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०११" तयार केले आहेत. सदर प्रारुप विनियम आयोगाच्या mercindia.org.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहेत.

आयोग, याद्वारे उपरोक्त प्रारुप विनियमावर ग्राहक प्रतिनिधी, अन्य संबंधित आणि जनतेकडून हरकती आणि सूचना मागवित असून, या हरकती आणि सूचना, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५, या पत्त्यावर व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्सने किंवा ई-मेल mercindia@mercindia.org.in द्वारे दि. २५ नोव्हेंबर, २०११ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने कृपया पाठवाव्यात.

सही

(कुलदीप ना. खवारे)
सचिव, मविनिआ

मुंबई
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०११.